**महाराष्ट्र शासन**
**नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण**
**मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, नाशिक रोड, नाशिक - 422101**
**दुरध्वनी क्र.** 0253-2461909 **Email- kumbhmela.2027@mah.gov.in**

प्रति,

1. मा. जिल्हाधिकारी, नाशिक.
2. मा. आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक.
3. मा. पोलीस आयुक्त, नाशिक शहर.
4. अधीक्षक अभियंता (लाभक्षेत्र विकास प्राधिकरण), जलसंपदा विभाग, नाशिक.

विषय:- दिनांक 26/08/2025 रोजी नाशिक महानगरपालिकेच्या कुंभमेळा विषयक प्रकल्पांबाबत झालेल्या आढावा बैठकीचे इतिवृत्त.

महोदय/ महोदया,

सिंहस्थ कुंभमेळा 2027-28 अंतर्गत दिनांक 26/08/2025 रोजी मा. अध्यक्ष, नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण तथा विभागीय आयुक्त महोदय यांचे अध्यक्षतेखाली नाशिक महानगरपालिकेच्या कुंभमेळा विषयक प्रकल्पांबाबत झालेल्या आढावा बैठकीचे इतिवृत्त यासोबत पुढील कार्यवाहीस्तव पाठविण्यात येत आहे.

आपली विश्वासू,

सोबत:- वरिल प्रमाणे.

Signed by Karishma
Nandakumaran Nair
Date: 28-08-2025 17:23:49

(करिष्मा नायर)
कुंभमेळा आयुक्त तथा सदस्य सचिव,
नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण, नाशिक

नाशिक महानगरपालिकेच्या कुंभमेळा विषयक प्रकल्पांबाबत आढावा बैठकीचे इतिवृत्त.

दिनांक 26/08/2025 रोजी दुपारी 04.30 वाजता डॉ. प्रवीण गेडाम, अध्यक्ष, नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण तथा विभागीय आयुक्त, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली नाशिक महानगरपालिकेच्या कुंभमेळा विषयक प्रकल्पांबाबत आढावा बैठक झाली. त्याबाबत त्यावेळी पुढील अधिकारी उपस्थित होते.

1. श्रीमती मनिषा खत्री, आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक.
2. श्रीमती करिष्मा नायर, कुंभमेळा आयुक्त तथा सदस्य सचिव, नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण.
3. श्रीमती राणी ताटे, सहआयुक्त (गोदावरी संवर्धन कक्ष आणि करमणूक शुल्क), विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक.
4. श्री रवींद्र भारदे, उपजिल्हाधिकारी, नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण.

बैठकीत पुढीलप्रमाणे विषयनिहाय चर्चा करण्यात आली व सूचना देण्यात आल्या.

1. जलशुद्धीकरण केंद्र आणि पाणीपुरवठा योजना:-

याबाबत उपांगनिहाय, कालमर्यादा दर्शविणारी तसेच शहरातील वितरण व्यवस्थेला ही कशी जोडली जाईल इत्यादी स्वरुपाची माहिती उपलब्ध नव्हती. त्यामुळे याचा आढावा घेणे शक्य झाले नाही. याबाबतची माहिती पुढील बैठकीत द्यावी असे निर्देश अध्यक्षांनी दिले.

2. मलजल शुद्धीकरण केंद्र व मलनिस्सारण यंत्रणा:-

याबाबत उपांगनिहाय माहिती, मालमर्यादा तसेच शहरातील मलजल निस्सारण व्यवस्थेला ती कशी जोडली जाणार याची माहिती उपलब्ध नव्हती. यावर आयुक्त, महानगरपालिका यांनी असे सांगीतले की, सदरचा प्रकल्प outcome based असल्याने ती अद्याप तयार नाही. तरीही जी माहिती तयार आहे ती पुढील बैठकीत सादर करावी असे अध्यक्षांनी सूचित केले.

3. रामकाल पथ:-

याविषयीची माहिती पुढील बैठकीत देण्यात येईल, असे आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांनी सांगितले.

4. रस्त्यांची निवड:-

पोलीस विभागासोबत झालेल्या सल्लामसलतीनुसार रस्ता निवड यादी अंतिम टप्प्यात असल्याचे आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांनी सांगितले. याबाबत अध्यक्ष यांनी आदेशित केले की, तूर्त दाखविण्यात आलेल्या रुपये 1200 कोटीच्या नियतव्ययामध्ये सर्व अस्तित्वातील आणि प्रस्तावित घाट, रेल्वे स्थानक, बस स्थानके, पार्किंग अशा कुंभमेळ्याशी संबंधित महत्त्वाच्या स्थळांकडे जाणाऱ्या रस्त्यांसाठी नियतव्यय स्पष्टपणे ठेवावा. त्यानंतर उर्वरित निधीतून प्राधान्याने शहराअंतर्गत इतर आवश्यक रस्ते कुंभमेळयाच्या दृष्टीने प्राधान्याने घ्यावेत. शहरासाठी SH-37 चे बळकटीकरण करुन एक रिंग रोड सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत तर एक शहराच्या नजिकच्या बाजूस महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळामार्फत प्रस्तावित आहे हे देखिल ध्यानात घ्यावे. या सर्व बाबी ध्यानात घेऊन यादी निश्चित करावी. याप्रमाणे यादी निश्चित न केल्यास त्यावरील अतिरिक्त खर्च नाशिक महानगरपालिकेने स्वतःच्या निधीतून करावा. याबाबत अधिक रस्ते निश्चिती करुन त्यांची प्रक्रीया करण्याबाबत आयुक्त, महानगरपालिका यांनी विनंती केली. यावर अध्यक्षांनी स्पष्ट केले की, वर नमूद प्राधान्यक्रमानुसारच रस्तानिहाय प्राधान्यक्रम ठरवून कुंभमेळा निधीतून कामनिहाय प्रशासकीय मान्यता देण्यात येईल. तसेच याऊपरचे रस्ते घेतल्यास ते नाशिक महानगरपालिका स्वत:च्या निधीतून घेऊ शकतात. भविष्यात महानगरपालिकेला

रस्त्यासाठी शासनातर्फे कुंभमेळा निधीतून अधिक निधी उपलब्ध झाल्यास त्यातून शासनाच्या मान्यतेने समायोजन करण्यास हरकत नाही. रस्त्यांची यादी निश्चित करण्यासाठी आवश्यकतेनुसार बैठक बोलविण्यात येईल.

5. साधुग्राम:-

मा. प्रधान सचिव, मुख्यमंत्री कार्यालय यांनी दिलेल्या निर्देशांनुसार अभ्यास अंतिम करायला आणखी दोन महिने लागणार आहेत, असे आयुक्त नाशिक महानगरपालिका यांनी सांगितले. तथापि सदर विषय अधिक तातडीने मार्गी लावावा, असे अध्यक्षांनी निर्देश दिले.

Signed by
Praveen Nilkanthrao Gedam
Date: 28-08-2025 15:41:08

(डॉ. प्रवीण गेडाम)
अध्यक्ष, नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण तथा,
विभागीय आयुक्त, नाशिक